# कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन

## ( नव्वदोत्तरी साहित्याच्या विशेष संदर्भात )

## प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख सेवा गौरव ग्रंथ



संपादन

प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी | डॉ. अरविंद हंगरगेकर | डॉ. शिवाजी शिंदे

Kathatma Sahitya : Vimarsh aani Vivechan
( Navvadottari Sahityachya Vishesh Sandarbhat )
Prof. Dr. Shivajirao Deshmukh Seva Gaurav Granth

Sampadan - Principal Dr. Prashant Chaudhari,
Dr. Arvind Hangargekar, Dr. Shivaji Shinde

कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन
( नव्वदोत्तरी साहित्याच्या विशेष संदर्भात)
प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख सेवा गौरव ग्रंथ

संपादन - प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी,
डॉ. अरविंद हंगरगेकर, डॉ. शिवाजी शिंदे

प्रकाशक - देविदास बाळासाहेब पाटील
स म ग्र प्रकाशन
शिवछत्रपती नगर हडको वसाहत,
तुळजापूर ४१३६०१
मो. क्र. ८८८८१५०५०३
Mail - dasbpatil@gmail.com

मुद्रक : अक्षरमुद्रा, पुणे
मुखपृष्ठ : दास पाटील
अक्षरजुळवणी : नेताजी जावीर, धाराशिव
ग्राफिक डिझाइन : ए. ए. डिझाइन्स, धाराशिव

ISBN - 978-81-963811-3-4

© प्रा. सौ. कौशल्या शिवाजीराव देशमुख

४/१८, "राजमाची' विद्यानगर क्र.२,
सिव्हिल हॉस्पिटल जवळ,सोलापूर.-४१३००३
भ्रमणध्वनी-९४२३०६७२८०, ८८३०५०७०२०

पहिली आवृत्ती - बुधवार, दि. १२ जुलै २०२३

मूल्य - ₹ ३०० /-

(टीप : प्रस्तुत अंकातील विविध लेखांत व्यक्त झालेली मते ही त्या-त्या लेखकांची आहेत.
त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

# अंतरंग

१) कोरडा पाऊस । डॉ.सूर्यनारायण रणसुभे ।१०।
२) तौलनिक साहित्याचे मूल्य आणि तौलनिक कथात्म साहित्य । डॉ.अरुण चिंतामण प्रभुणे ।२०।
३) मराठीतील पहिली इतिहास वैज्ञानिक आत्म-प्रक्षिप्त अति-कादंबरी : पिपिलिका मुक्तिधाम। प्रा.डॉ.आनंद पाटील ।२६।
४) रवींद्र शोभणे यांच्या २००० नंतरच्या कथात्मक साहित्यातील मूल्यात्मकता । डॉ. अनिल बोपचे ।३९।
५) शेषराव मोहितेंच्या दोन कादंबऱ्या : असं जगणं तोलाचं आणि धूळपेरणी । डॉ. किशोर सानप ।४६।
६) मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथाविश्व । डॉ.रवींद्र शोभणे ।६०।
७) नदीष्ट : गती आणि वेगासह प्रवाहित होणारी आशयघन कादंबरी । सतीश बडवे ।७४।
८) महात्मा जोतीराव फुले आणि मराठी ग्रामीण कादंबरी । प्रा. प्रल्हाद जी.लुलेकर ।८३।
९) स्वातंत्र्योत्तर राजकीय कादंबरी । डॉ.रवींद्र ठाकूर ।१०२।
१०) 'बोराडे गुरुजी, आम्हाला क्षमा करा' । डॉ. सुरेश सावंत, नांदेड ।११०।
११) ग्रामीण साहित्याची भाषा । प्राचार्य डॉ. महेंद्र कदम ।११४।
१२) मराठी कादंबरीतील निसर्गचित्रण आणि 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' । डॉ. रणधीर शिंदे ।१२२।
१३) समकालीन ग्रामीण वाताहतीचे चित्रण 'उलंगवाडी' । डॉ. एस. एम. कानडजे।१३१।
१४) टिश्यू पेपर : हॉटेल विश्वाचं विदारक चित्रण । डॉ.पी.विठ्ठल ।१३८।
१५) मराठी विनोदी कथाप्रवाह समृद्ध करणारा कथासंग्रहः 'थट्टा मस्करी'। डॉ.अरुण ठोके ।१४७।
१६) आशा बगे यांच्या सेतू व भूमी या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास । प्रा.डॉ.श्रुतीश्री वडगबाळकर ।१५६।
१७) व्यवस्थेला क्षमा करणाऱ्या लेखिकेचे आत्मकथन : आरपार । देविदास फुलारी ।१६२।
१८) बुर्गांट : स्त्रियांना बळ देणारी कादंबरी । सना पंडित ।१६८।
१९) 'मानवी जीवनातील व्यापक सत्तासंघर्षाचे चित्रण करणारी कथा' : 'अस्तित्वाची शुभ्र शिडे' । प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे ।१७२।
२०) २००० नंतरच्या कथात्मक साहित्यातील ग्रामीण स्त्रीचे कृषीजीवन ।डॉ.गुंफा कोकाटे ।१७८।
२१) डॉ. श्रीकांत पाटील यांच्या ग्रामीण कादंबऱ्यातील जगण्याचे सूत्र ।सौ वंदना कुलकर्णी ।१८६।
२२) शिक्षणसंस्कृती मांडणारे आत्मकथन : 'न मेचता' ।प्रा.डॉ.कैलास देवराम सलादे ।१९०।
२३) 'राजमाची'तील आत्मियतेचा सहवास । दादा गोरे ।१९६।
२४) गोमंतकीय मराठी कथांमधून जाणवणारे सांस्कृतिक परिप्रेक्ष । डॉ. विनय मडगांवकर ।१९८।

# गोमंतकीय मराठी कथांमधून जाणवणारे सांस्कृतिक परिप्रेक्ष

– डॉ. विनय मडगांवकर, गोवा
चलभाष : ८३०८४७७६६४

**प्रास्ताविक**

राष्ट्राच्या तथा राज्याच्या भौगोलिक सीमा आज जशा आहेत, तशा इतिहासात नव्हत्या. राजकीय परिस्थितीनुरूप त्या बदलत राहिल्या. गोव्याच्या राजकीय स्थित्यंतराच्या कालक्रमाचा अभ्यास करतांना याचा प्रत्यय येतो. सध्याच्या भौगोलिक सीमांद्वारे मर्यादित असलेल्या विद्यमान गोवा राज्याचा भूभाग, काही काळ शेजारील राज्यांशी जोडलेला होता, हे ऐतिहासिक वास्तव आहे. गोव्याच्या राजकीय तसेच प्रशासकीय संरचनेसाठी आवश्यक असलेल्या या भौगोलिक सीमारेषा रेखाटण्याआधीपासून गोमंतकीय जनता शेजारील प्रदेशांशी सांस्कृतिक अनुबंध जोपासत आली आहे. त्यामुळे 'गोवा' हे नाव प्रशासकीय संरचना दर्शक आहे, तर 'गोमंतक' या नावात सांस्कृतिक परिप्रेक्ष दर्शवणारे व्यापकत्व आहे. हेच 'गोमंतकीयत्व' गोमंतकीय मराठी कथाकारांच्या कथाबीजांमधून साहित्यसृष्टीत अंकुरित केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात गोमंतकीय मराठी कथांमधून जाणवणाऱ्या सांस्कृतिक परीप्रेक्षांचा परामर्श घेतला आहे.

**सत्ता आणि संस्कृती :–**

भारतात इ. स.१८१८ मध्ये इंग्रजांनी सत्ता संपादन केली. त्याआधी इ. स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी तिसवाडी– गोवा जिंकून घेतले. १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. गोव्यावर मात्र पोर्तुगीजांची सत्ता सुमारे १४ वर्षे होती. अर्थात इतकी वर्षे सार्वभौम भारतापासून गोवा वेगळाच राहिला. पोर्तुगीजांनी, त्यांच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मांतराचा प्रसार केला. कोलवाळ गोवा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी दोन ख्रिस्ती धर्मप्रसारकांना दंडीत केले होते. मराठे महाराष्ट्रात परतल्यावर मिशनऱ्यांनी पुन्हा धर्मपरीवर्तनाला आरंभ केला. येवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर येथील जनतेला त्यांच्या संस्कृतीपासून तोडण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी 'झेवियर' या जेजूइत मिशनऱ्यांने पोर्तुगीज राजकर्त्यांना इन्क्विझिशन ही धर्मसमिक्षण सभा गोव्यात आणायला भाग पाडले. जे गोमंतकीय धर्मपरीवर्तीत होऊन ख्रिस्ती झालेत, ते जर पुन्हा आपल्या ३ पुर्वाश्रमीच्या हिंदू संस्कृतीनुसार वागले, तर ते वा इन्क्विझिशनच्या धर्मसमिक्षण सभेत आरोपी म्हणून आणले जात. आरोप सिद्ध झाल्यास कमाल शिक्षा म्हणून 'आवतु-द-फॅ' या उत्सवात त्याला जिवंत जाळले जात असे. त्यापुढे

या धर्म परीवर्तीतांचे राष्ट्रीयत्व नष्ट करण्याचाही प्रयत्न केला, याचा सप्रमाण आलेख गोमंतकीय क्रांतीवीर टी. बी. कुन्हा यांनी गोमंतकीयांच्या राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास' या आपल्या ऐतिहासिक ग्रंथात मांडला आहे. तो प्रयत्न भारतीय सेना, राष्ट्रभक्त येथील स्वातंत्र्यसैनिक, सद्गुरू जीवनमुक्त महाराजांसारखे धर्मगुरू यांच्यामुळे असफल ठरला. १९ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तुगाली सत्तेपासून गोवा मुक्त झाला, 'भारतात' समावला गेला.

गोमंतक आणि कथासाहित्य यांचा सहसंबंध भारतीय साहित्यविश्वात 'महाभारत' हे असंख्य कथांचे भांडार आहे. या महाभारताच्या भीष्मपर्वात गोव्याचा उल्लेख 'गोपराष्ट्र', 'गोमंत' असा आहे. 'हरिवंश' या ग्रंथानुसार भगवान श्रीकृष्णाने मथुरेच्या राजा कंसाचा वध केल्यानंतर त्याचा सासरा जरासंधने मथुरेवर वारंवार हल्ले केले. शेवटी भगवान श्रीकृष्ण समरांगण सोडून गोमंतकाच्या आश्रयाला आले. 'हरिवंश' या ग्रंथांमध्ये श्रीकृष्ण आणि जरासंधाचे युद्ध आणि कालयवनाचा पराभव 'गोमंतक' शिखरावर झाल्याचे कथन केले आहे. प्राचीन भारतीय कथाग्रंथांमध्ये गोमंतकाचा उल्लेख लक्षवेधी आहे. संत एकनाथांच्या एकनाथी भागवत या ग्रंथाआधी, गोव्यातील कृष्णदास शामा यांनी 'श्रीकृष्णचरित्रकथा' या ग्रंथाची रचना केली होती. पांडुरंग सखाराम शेणवी पिसुर्लेकर यांनी शोध घेतलेल्या पोर्तुगीजपूर्व ग्रंथाची यादी अ. का. प्रियोळकर यांनी संपादित केलेल्या 'क्रिस्ताचे यातनागीत' या विलापिकेच्या प्रस्तावनेत दिलेली आहे. त्यानुसार श्रीकृष्णचरित्रकथा, प्रल्हादचरित्र, हरीचंद्रपुराणकथा वशिष्ठयोग गरुडाची कथा, बालक्रीडा, कर्णपर्व, शुकदेवचरित्रकथा, सीताहरण मृगराजाची कथा हे ग्रंथ पांडुरंग पिसुर्लेकर यांना पोर्तुगालामध्ये प्राप्त झाले होते. अशा पोर्तुगीजपूर्व ग्रंथांचा आधार घेत फादर स्टीफन्सने येशूच्या कथा 'क्रिस्तपुराण' या ग्रंथात कथन केल्या आहेत. इंग्लंडमधून गोव्यात आलेल्या या ब्रिटीश जेजुइत ग्रंथकाराने रोमन लिपीत मराठी ग्रंथ रचला. पोर्तुगीजांनी धर्मांतरित केलेल्या लोकांना त्यांच्या धर्मात टिकवून ठेवण्यासाठी स्टीफन्सने या ग्रंथाची रचना करणे स्वाभाविक होते. पोर्तुगीजांनी गोव्यात सत्ता प्राप्त केली, धर्मपरिवर्तन केले, इतकेच नव्हे तर गोमंतभूमीत रोमन संस्कृती लादण्यासाठी क्रूर छळाचा आणि बळाचा आधार घेत इनक्विझिशन आणले.

**सांस्कृतिक संक्रमण :–**

सत्तांतराच्या या इतिहासामुळे गोव्याचा भूगोल बदलला आणि सांस्कृतिक पर्यावरणही बदलले. गोमंतकीय संस्कृतीवर पोर्तुगीजांच्या रोमन संस्कृतीचा परीणाम दिसू लागला. श्रीकृष्णाष्टमीला मध्यरात्री श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करणारे, काही धर्मपरीवर्तीत झाल्याने नाताळाला मध्यरात्री ख्रिस्तजन्म सोहळा साजरा करू लागले. तुळसी वृंदवनाची जागा सफेद क्रॉसने घेतली. पारंपरिक वेशभूषा सोडून पाश्चात्य पोशाख स्वीकारला. विवाहपद्धती, जन्मदिन समारोह तसेच अंतिमक्रिया यां संस्कारांतही रोमन प्रणालीचे पालन कटाक्षाने होण्यासाठी पोर्तुगीज प्रशासन दक्ष होते. मंदिरातील पूजारी ऐवजी चर्चाचा पाद्री, त्यांच्या देवकृत्यात महत्त्वपूर्ण ठरला. शिग्मोत्सवाच्या भव्य मिरवणूकीत सहभागी होणारे, कार्निवालमध्ये रमू

लागले. काजूबरोबर माकुराद मागेस यांसारखे आम्रवृक्ष आमरायीत दिसू लागले. काही धर्मांतरित गोमंतकीयांची नावं बदलली, आहार बदलला, आचार बदलला, विचार बदलले. या बदलल्या सांस्कृतिक पर्यावरणाचा प्रभाव भाषेवर व त्या भाषेतून निर्माण झालेल्या साहित्यावर प्रकर्षाने दिसू लागला.

**हृदयस्पर्शी कथासंग्रह 'आधारवड'**

गोव्यातील काहींना स्वदेशापेक्षा परदेश अधीक प्रिय वाटू लागले. केवळ पैशासाठी आपल्या माणसांना दूर करून परक्यांना जवळ केले गेले. या मानसिकतेमुळे वडीलधाऱ्यांची मनातील वेदना व्यक्त करणारी गौरी भालचंद्र यांच्या 'आधारवड' या संग्रहात 'वाडा' ही अशाच एका मातेची कथा आहे. कथेच्या अरंभीच मुलाला भेटण्यासाठी मातेच्या मनातील आतूर भावना व्यक्त होते. ''आज बऱ्याच वर्षांनी आल्फेड घरी परतणार आहे. काजाराक आयल्लो तितलोच... धा वर्सा पयली.'' कोकणी शब्दांनी ही आतूरता अधीक जाणवते. परदेशातून आलेल्या या मुलाला ती जेवायला सांगते. माशांची कडी सोबत राईस, तोंडाक पापलेटची कांपा ही अन्नसंस्कृती पिज्जा बर्गर खणाऱ्या मुलाला आवडत नाही. शेवटी मातेचे राहते घरच विकायला तो सांगतो. तेव्हा मात्र ती संतापते, म्हणते ''काहीही झाले तरी हे घर... हा 'आधारवड' मी विकू देणार नाही. मी असे पर्यंत... आणि मेल्यानंतर हे घर सरकारजमा होईल अशी सोय करून ठेवली पाहिजे लवकरच.'' असं मनाशी ठरवत ती घरात जायला वळली समर्थपणे. आज गोव्यात जमिनीच्या विकून, पारतंत्र्य घेतले जात आहे. आपल्या मुलाबाळांच्या भविष्याचा तरी विचार करणे अपेक्षित आहे.

'ओझे' कथासंग्रहातील परंपरेचे 'ओझे'

आपल्या चांगल्या प्रथा परंपरांचा सन्मान करणे उत्तमच, पण त्याचा अतिरेक होऊ नये. विठ्ठल गांवस यांच्या 'ओझे' या कथासंग्रहातील 'ओझे' ही कथा परंपरेचे ओझे वाहणाऱ्या जानूची आहे. भाटकाराच्या भाटात कबाड कष्ट करणारा जानू मेहनती आहे. प्रामाणिक आहे. कर्ज काढून तो आपल्या मुलीचा विवाह करतो. हप्ते परत करतांना त्याला जड जाते. त्यात विवाहानंतर ओझे पाठवण्याची प्रथा गोव्यात आहे. चवथीचे ओझे कसे पाठवावे? या विचाराने त्याला ग्रासले होते. भाटकारीण त्याला आपल्या मुलीचे ओझे पोहोचवण्यासाठी जानूला सांगते. तो ते घेऊन स्वतःच्या मुलीच्या घरी जातो, त्यावेळी बाहेर बसलेल्या जानूच्या कानावर घरातील त्याच्या मुलीबरोबर बोलणाऱ्या जावयाचे शब्द पडतात ''असो कसो गो तुजो बापूस? भिकारडो मगो तो. ओझं स्वताःच्याच डोक्यावर घेऊन इलो. मनाय आणला असता तर पैसे मी दितलंय आसलंय... सगळेजण माका हसताय, सासरो डोक्यावर ओझं घेवन इला म्हणान.'' हे ऐकून जानूच्या काळजाला पीळ पडतो. हृदयातील वेदना कळवळून तो कोणाकडे बोलू शकत नव्हता, तडक उठून निघून जातो. परंतु तो कुठे जातो? त्याचे पुढे काय होते? या विषयी वाचकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो. विठ्ठल गांवसांच्या कथांचे शेवट वाचकांना नेहमी विचार करायला प्रवृत्त करतात.

**संस्कार संचिताचा कथाकुंभ यक्षप्रश्न**

बदलत्या काळानुसार माणसाचे राहणीमान बदलले, पण गृहस्थाश्रमी गोमंतकीय सुसंस्कार अजून टिकून आहेत. या संस्कृतीचे मर्म बाळ सप्रे आपल्या 'यक्षप्रश्न' या कथासंग्रहातील 'अर्थ' या कथेत सांगतात. कथेतील वृंदा ही व्यक्तीरेखा वसुधेला सहज म्हणते, ''आम्ही गोवेकर कधी पाहूण्यांना जेवायला घातल्याशिवाय परत पाठवतो का?'' धनाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती आजही येथे आहे. घराचे वाडे झालेत, पण बालपणीच्या आठवणीमुळे संस्कारांच्या श्रीमंतीने समृद्ध असलेल्या जुन्या घराची सर, धनाच्या श्रीमंतीचे वैभव मिरवणाऱ्या मोठ्या दिमाखदार वाड्याला येत नाही, हे ही या कथेतून व्यक्त होते.

**कुप्रथांची व्यथा मांडणारा 'पराधीन' कथासंग्रह**

एकीकडे गोमंतक प्रगतीपथावर मार्गक्रमण होत आहे, तर दुसरीकडे कुप्रथांची परंपराही तेथे काही ठिकाणी जोपासली जात आहे. संजय जोशी यांच्या 'पराधीन' या कथासंग्रहातील 'शेवटचा निर्णय' या कथेत शेफाली ही मनोरूग्ण आहे. मानसोपचार तज्ज्ञांकडून तिच्यावर उपचार करण्याऐवजी तिला मांत्रिकाकडे नेले जाते. तिसऱ्या सहस्रकारंभीही अंधश्रद्धा जोपासणाऱ्या वृत्तीचे दर्शन या कथेत होते.

**प्रश्न निर्माण करणारा कथासंग्रह 'प्यादी'**

विवाह हा आपल्या संस्कृतीतील महत्त्वपूर्ण संस्कार. त्या विषयी आज अनेक प्रश्न निर्माण होता. वधूपरीक्षा होते तशी वरपरीक्षा का होऊ नये? हा त्यातला एक. मनोमन वरलेल्या प्रियकराला सोडून मुलीला परक्या अपरीचित मुलाच्या गळ्यात माळ घालून गुदमरून जगायला भाग पाडले जाते. काहीवेळा वराच्या नपुंसकत्वामुळे, व्यसनांमुळे, कित्येकांचे आयुष्य उध्वस्थ होते. वासंती नाडकर्णी यांच्या 'प्यादी' या कथासंग्रहातील 'सल्ला' ही कथा या अशा विवाहसंस्थेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. या कथेत प्रशांतवर प्रेम करणाऱ्या अनघा या युवतीचा विवाह भलत्याच अपरीचित माणसाबरोबर ठरवला जातो. विवाहाच्या आधल्या रात्री तिला प्रियकराबरोबर पळून जाण्याचा सल्ला त्याच घरातील म्हातारी देते. या विषयी ती म्हणते, ''प्रियकराच्या आत्महत्येनंतर, प्रेयसीला करावा लागणार संसार, भूतासारखं घालवलेले वैवाहिक जीवन, या म्हातारीनं भोगलय ते आयुष्य, म्हणून तुला सल्ला दिला पळून जाण्याचा.'' सल्ला अनाकलनीय असला, तरी विचार करायला लावणारा आहे. ज्या आई-वडिलांनी प्रेमाने सांभाळले, पालन-पोषण केले, त्यांना सोडून ज्याच्यावर विश्वास ठेऊन हे धाडस केले, तो चांगला असेल तर ठीक, अन्यथा पश्चाताप करायची वेळ येते.

**परिश्रमांची दखल घेणारा कथासंग्रह 'साफल्य'**

सध्यस्थितीत गोव्यात विविधप्रकारे संस्कृती संक्रमण सुरू आहे. अर्थार्जनासाठी परप्रांतीयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. गोमंतकीयांपेक्षा अनेकदा अपराध करणारे आणि अपराधाला बळी पडलेले बहुतांशी परप्रांतीय असतात. समंजसपणे वागणारे काही

अपवादही आहेत. मनोहर कोरगांवकर यांनी अशाच एका सतप्पा नावाच्या कामगाराची 'सत्कार' नावाची कथा त्यांच्या 'साफल्य' या कथासंग्रहात आहे. एकेकाळी सर्वांना मजूरीसाठी आधार वाटणार सतप्पा मटक्याच्या आहारी जातो. तो सुधारावा या अपेक्षेने त्याचा सत्कार केला जातो.

सांस्कृतिक प्रदूषण दर्शवणारा कथासंग्रह 'जीवनमृत्यू' गोमंतकाचे सांस्कृतिक पर्यावरण संक्रमीत होत आहे, तसेच नैसर्गिक पर्यावरण प्रदूषित होत आहे. पैशांच्या हव्यासामुळे मानवाचे मानसिक अधःपतन होत आहे. विविध व्यसनांच्या तो आहारी जात आहे. विठ्ठल गावडे पारवडकर यांच्या 'जीवनमृत्यू' या कथासंग्रहातील 'पर्यावरण करपले' या कथेतील ॲलक्झेंडर ड्रग्ज घेणारा तसेच सदानंद नावाचा तरूण जुगाराच्या विळख्यात सापडलेला आहे. गोमंतकीय सांस्कृतिक पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या या वाढत्या विकृतीचे दर्शन या कथेत होते.

**समारोप**

गोमंतकीय मराठी कथा कालपरत्वे संस्कारक्षम, सकस आणि दर्जेदार होत आहे. येथील कथाकार वाचकांच्या अंतर्मनाचा वेध घेत, स्वानुभवाचे जळजळीत वास्तव कथांमधून सहजतेने मांडत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात विठ्ठल गांवस यांची 'ओझे', बाळ सप्रे यांची 'अर्थ', संजय जोशी यांची 'शेवटचा निर्णय', वासंती नाडकर्णी यांची 'सल्ला', मनोहर कोरगांवकर यांची 'साफल्य', विठ्ठल गावडे पारवडकर यांची 'पर्यावरण करपले', गौरी भालचंद्र यांची 'वाडा' अशा प्रातिनिधिक गोमंतकीय लेखकांच्या कलाकृतींचा परामर्श घेतला आहे. या गोमंतकीय कथांचा विचार केल्यास असे दिसून येते, की गोमंतकीय कथांमध्ये एकीकडे परंपरानुरूप सांस्कृतिक परिप्रेक्षातील विषयांची मांडणी नव्याने केली आहे, तर दुसरीकडे झपाट्याने वाढणाऱ्या आधुनिकतेचा अतिरेक, त्यातून होणारे सांस्कृतिक संक्रमण आणि संघर्ष यांचे चित्रण केले आहे. संस्कारांचे संचित जपत मानवी जीवनाचा विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या, तसेच कुप्रथांची व्यथा मांडत काळजाला भिडणाऱ्या कथा, गोमंतकीय लेखकांच्या लेखणीतून आतापर्यंत आविष्कृत झाल्या आहेत.

**निष्कर्ष**

१. गोमंतकीय कथाकारांच्या कथा वाचकांच्या अंतर्मनाचा वेध घेत, त्यांच्या बुद्धीला आवहन करत मानवी जीवनाचा विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या आहेत.

२. लेखक आपल्या कथांमधून स्वानुभवाचे वास्तव सहजतेने मांडतात.

३. गोमंतकीय साहित्यिक कथांमधून अहितकारी प्रथांचेही ते दर्शन घडवतात.

४. गोमंतकीय कथाकार सांस्कृतिक पर्यावरणातील संक्रमणातून तसेच संघर्षातून जगण्याची प्रेरणा घेणाऱ्यांना प्राधान्य देताना दिसतात.

५. गोमंतकीय कथांमध्ये परंपरानुरूप सांस्कृतिक संचित जपण्याची प्रवृत्ती आहे.

६. वाढणाऱ्या आधुनिकतेचा अतिरेक, त्यातून होणारे सांस्कृतिक संक्रमण आणि

संघर्षही कथाकारांनी टिपला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. पोर्तुगेज – मराठे संबंध, डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६३.

२. प्रभु भेम्ब्रे, लक्ष्मीकांत, पुर्तुगाली राजवटीपूर्वीचे गोव्यातील धार्मिक वाक्य, गोमंतक मराठी भाषा परिषद, गोवा, १९८९.

३. Priolkar, -. K., The Goa Inquisition, Rajhans Publication, Goa, 1961.

४. गोमंतकीय मराठी वाक्याचा इतिहास (खंड पहिला) संपा. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई व प्रा. रवींद्र घवी, गोमंतक मराठी अकादमी, गोवा, २००३.

५. टी. बी. कुन्हा, गोमंतकीयांच्या राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास, अनुवाद : प्रफुल्ल गायतोंडे, गोमंतक मराठी अकादमी, गोवा, १९९१.

६. प्रियोळकर, अ. का., संपा. क्रिस्ताचे यातनागीत, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९५९.

■■